शुक्रवार, दि. ४ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मराठवाडा शिक्षक संघाचा एल्गार

### शंभर टक्के जुनी पेन्शन योजनेसाठी संपूर्ण मराठवाड्यात १० जुलै रोजी धरणे आंदोलन

**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** सर्वांनाच जुनी पेन्शन लागू करावी व राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार अनुदान द्यावे, राज्यातील खाजगी इंग्रजी माध्यम ांच्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवासंरक्षण व यथानियम वेतन देण्यात यावे या व इतर मागण्यांच्या पुर्ततेसाठी मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर १० जुलै रोजी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम यांनी मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्री यांना पाठविण्यात आले आहे.

या बाबत मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, कोणत्याही देशाची प्रगती त्या देशातील शिक्षण आणि शिक्षक व शिक्षणाशी संबधीत घटकांची स्थिती यावर अवलंबून असते. ज्या देशांनी शिक्षणास सर्वोच्च प्रधान्य दिले ते देश जगात महासत्ता म्हणून मानाने मिरवत आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतीय राज्यकर्त्यांनी शिक्षणास तेवढे महत्व दिले नाही. महान शैक्षणिक परंपरा असलेले म हाराष्ट्र राज्य देखील त्यास अपवाद नाही.

राज्य सरकारच्या धरसोडीच्या व नकारात्मक शैक्षणिक धोरणांमुळे राज्यातील शालेय शिक्षण विभाग प्रश्नग्रस्त बनला आहे. राज्यकर्त्यांनी स्वत:साठी आकर्षक पेन्शन योजना लागू करून घेतलेली असताना शिक्षक शिक्षकेत्तरांना अतिशय कुचकामी अशी अंशदायी पेन्शनयोजना लागू केली आहे. गेल्या पाव शतकांपासून राज्यातील हजारो शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी विनावेतन किंवा अल्प वेतनावर काम करित आहेत. ही खेदाची बाब आहे. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व शिक्षणाशी संबंधीत इतर घटकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे या सर्व घटकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. तो व्यक्त करण्यासाठी आणि खालील मागण्यांच्या पुर्ततेसाठी दि. १०/०७/२०२५ रोजी गुरुवारी सायं. ०४ ते ०६ या वेळेत मराठवाडा विभागातील सर्व शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित केले आहे. या आंदोलना मागच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे अंशदायी पेन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेन्शन योजना लागू करावी. ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना इतर राज्य सरकारी कर्मचाऱ्या प्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याची कार्यवाही ताबडतोब करावी., राज्यातील निकषपात्र विनाअनुदानित शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रानुसार १००% अनुदान देऊन शिक्षकांची वेठबिगारी संपवावी. २०%,४०%,६०%,८०%टप्पा वाढीचे आदेश लवकरात लवकर निर्गमित करावेत. शाळांच्या संचनिर्धारणामधे क्रिडा व कला शिक्षकांची पदे मंजूर करावीत.

४) राज्यातील इंग्रजी माध्यम ांच्या शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना यथानियम वेतन व सेवासंरक्षणाचे सेवानियम लागू करण्यात यावेत., राज्यातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १०,२०,३० अशा तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी.

६) ०१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु भनिनि व एनपीएस खाते नसलेल्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या फरकाचे हप्ते रोखीने देण्यात यावेत., आरटीई २००९ अंतर्गत खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची थकबाकी अदा करण्यात यावी., २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्यात येवू नयेत. समूह शाळा संकल्पना रद्द करण्यात यावी. १० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांवर कंत्राटी शिक्षक भरतीचा शासनादेश रद्द करावा., राज्यातील शिक्षकांची सुमारे ६५००० रिक्त पदे तात्काळ भरावीत., पहिली ते बारावी पर्यंतच्या सर्व माध्यम ांच्या शाळांना शंभर टक्के वेतन आणि वेतनेतर अनुदान देण्यात यावे., शिक्षकांच्या नियुक्त्या स्वयंसेवक करण्याचा ठराव भंडारा जिल्हा परिषदेने घेतला आहे तो शिक्षकांचा अपमान करणारा असल्याने रद्द करण्यात यावा. त्याचप्रमाणे नागपूर जिल्हा परिषदेचे मानधनावर शिक्षक नियुक्तीचा आदेश रद्द करण्यात यावा. शिक्षक पाल्यांना विहित दराने अर्थसाह्य करणारा १६ मार्च २०२१ चा शासनादेश रद्द करून शिक्षक पाल्यांना सर्व स्तरावरील मोफत शिक्षणाचा शासनादेश लागू करावा. सर्व शैक्षणिक संस्थांचे वेतनेतर अनुदान सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात यावे., शिक्षकांची रिक्त पदे त्वरीत भरण्यास परवानगी द्यावी., शिक्षण सेवक पद रद्द करून शिक्षकांना नियमित वेतन श्रेणीत नेमणुका देण्यात याव्यात., शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करावी., सेवा निवृत्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकिय प्रतिपूर्ती योजना लागू करावी., शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करण्यात यावे., शिक्षकेत्तर कर्मचारी भरती बंदी उठवावी., शालार्थ प्रणालीत नावे समाविष्ट करण्यासाठी जाणिवपूर्वक होणारा विलंब टाळण्यात यावा., सेवेत असताना दिवंगत / अकाली सेवानिवृत्त झालेल्या खाजगी (अनुदानित व विनाअनुदानित ) शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यात यावी., आश्रमशाळा शिक्षकांचे वेतन नियमितपणे करण्यात यावे, वार्षिक वेतनवाढीस होणारा विलंब आणि अडवणूक यासह इतर प्रश्न मार्गी लावावेत., माध्यमिक विद्यालये आणि कनिष्ठ महाविद्यालयातील नैसर्गिक वाढीव पदांना मान्यता देण्यात यावी. इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांना वैयक्तिक मान्यता देण्यात याव्यात. शाळांच्या संचनिर्धारणामधे शारिरीक शिक्षक व कला शिक्षकांची पदे मंजूर करण्यात यावीत., नगर पालिका, महानगर पालिका व इतर शाळांचा इमारतीवरील कर माफ करण्यात यावा आदी मागण्यांचा समावेश आहे.

या मागण्यांच्या पुर्ततेसाठी १० जुलै रोजी **पान २ वर**

प्रामाणिक रिक्षा चालकाचे सर्वत्र कौतुक

## रिक्षात राहिलेला आयफोन केला परत



**मुंबई । प्रतिनिधी -** कामाच्या घाई गडबडीत अनेकांना आपल्या वस्तू रिक्षा, बस, टॅक्सी मध्ये विसरण्याची सवय झाली आहे. परंतु एखादा प्रामाणिक टॅक्सी, बस आणि रिक्षा चालक आपल्या गाडीत विसरून गेलेल्या व्यक्तीला त्याची वस्तू परत करतो.

बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्सम ध्ये किशोर भिमसेन धडके यांच्या रिक्षा मध्ये एका व्यक्तीने त्याच्या बायकोच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आय फोन विकत घेतला आणि घाई गडबडीत तो फोन रिक्षात विसरून निघून गेला. हि बाब किशोर धडके यांच्या लक्षात येताचं त्यांनी त्या व्यक्तीचा सर्वत्र शोध सुरु केला. ती व्यक्ती काही सापडेना म्हूणन किशोर धडके यांनी त्यांच्या मित्रासह बीकेसीला आयफोन सेंटर आहे त्या सेंटर मध्ये जाऊन चौकशी केली. त्या सेंटरमधले कर्मचारी यांनी त्यांना प्रोत्साहन दिले व त्यांनी सांगितलं की हा फोन तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये जाऊन रीतसर त्याची नोंद घ्यावी पोलीसच सहकार्य करतील. तसेच किशोर धडके यांनी पोलीस स्टेशनला जाऊन पोलिसांना सर्व घटना सांगितली.

ज्या व्यक्तीचा मोबाईल हरवला आहे आणि तो त्यांना परत मिळावा म्हणून किशोर धडके यांचे प्रामाणिक प्रयत्न पाहून पोलीस सुद्धा आश्चर्य चकित झाले. पोलिसांनी सुद्धा त्यांना योग्य ते सहकार्य केले. काही वेळात ज्या व्यक्तीचा मोबाईल हरवला आहे ती व्यक्ती रीतसर तक्रार नोंदणी करण्याकरिता **पान २ वर**

## स्थलांतरित कुटुंबासाठी आरोग्य पोषन प्रशिक्षण संपन्न

**परतूर । प्रतिनिधी -** आष्टी जिल्हा परीषद व पंचायत समिती परतुर मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृह येथे अंगणवाडी ताई आशा ताई व एन एच एम सी बैठकी मधील सदस्याना उसतोड कामगारांना आरोग्य पोषण या बाबत प्रशिक्षण संपन्न झाले.

या प्रशिक्षण चे उद्घाटन प्रकल्प संचालक मा. अप्पासाहेब उगले, मा. भाउसाहेब गुजाळ, अश्वजित जाधव,डॉ. कुणाल कातोरे, श्रीमती अलका गोरे, वर्षाराणी राठोड, अनिता जाधव, म ीनाक्षी मोरे, सतिष नरगोडे, यांची उपस्थिती होती.

या प्रशिक्षण मध्ये आरोग्य गाव पातळीवर उसतोड काम गार चे आरोग्य गाव पातळीवर व उसतोडी साठी जाताना आपन काय काळजी घ्यावे व आरोग्य बाबत उपाय योजना आपन गाव पातळीवर अधार कार्ड आयुष्यमान कार्ड विमा इ आरोग्य सुविधा जनजागृती करणे.

गाव पातळीवर महिला रक्तक्षय अजार व इतर



आजार उपाय म्हणुन पोषन साठी त्याना किचन गार्डन किट वाटप करण्यात आले. त्यानी गाव पातळीवर उसतोड कामगारानी आपल्या घराच्या परीसरात भाजी पाला लावणे व तो कुटुंबासाठी दररोज अहार मध्ये कसे वापरावे या बाबत प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी प्रशिक्षक भास्कर साळवे जिल्हा समन्वयक एकनाथ राउत गाव स्वयंसेवक आकाश चैगुले महादेव खरात योगेश आढे यांची उपस्थिती होती.

## माहेश्वरी समाजातील इंजिनीयर किंवा मेडिकलच्या विद्यार्थ्यांना स्व. कमलाबाई काबरा ट्रस्ट कडून स्कॉलरशिप

**जाफराबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील नामांकित स्वर्गीय कमलाबाई लक्ष्मीनारायण काबरा चारिटेबल ट्रस्ट ही संस्था गरजूंना मदत करण्यात पुढाकार घेत असते. या माध्यमातूनच स्वर्गीय कमलाबाई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षांनी एका बैठकीद्वारे जाहीर केले आहे की, माहेश्वरी समाजातील इंजिनीयर किंवा मेडिकल कोर्सला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरमहा १००० रुपये स्कॉलरशिप देण्याचा जाहीर करण्यात आले आहे. या योजनेबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत असतानाच एडवोकेट प्रेमसुख काबरा स्वर्गीय कमलाबाई चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष यांनी सांगितले की कोणालाही या योजनेचा फायदा घ्यायचा असेल तर त्यांनी पुढील व्यक्तींशी संपर्क करावा. एडवोकेट पी एल काबरा जाफराबाद, पंकज काबरा टेंभुर्णी, **पान २ वर**

## सेवानिवृत्त शरद निश्चळ यांचा ग्रामस्थांतर्फे सत्कार

**जाफराबाद । प्रतिनिधी** - तालुक्यातील सातेफळ येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक शरद निश्चळ हे ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा स्थानिक गावकरी व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मारोती बनकर, तर प्राचार्य कैलास टाले, विस्ताराधिकारी राम खराडे, केंद्रप्रमुख गजानन मान्टे यांची प्रमुख उपस्थिती होती. शरद निश्चळ हे अतिशय कर्तव्यदक्ष, विद्यार्थी प्रेमी शिक्षक असल्याने त्यांना निरोप देताना सातेफळ ग्रामस्थ व विद्यार्थी भाऊक झाल्याचे दिसून आले. प्रत्येक शिक्षकाने निश्चळ यांच्याप्रमाणे विद्यार्थी हेच सर्वस्व मानून कार्य केले तर जिल्हा परिषद शाळांचे दिवस पालटायला वेळ लागणार नाही' अशा भावना यावेळी राजे संभाजी विद्यालयाचे प्राचार्य कैलास टाले यांनी व्यक्त केल्या.

यावेळी आपल्या आवडत्या शिक्षकाला निरोप देण्यासाठी सारा गाव लोटला होता. ढोल ताशांच्या गजरात मुख्याध्यापक निश्चळ यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली. सत्काराला उत्तर देताना आपण गावकऱ्यांनी केलेल्या स्वागताने भारावून गेलो असून आपल्या प्रेमातून कधीही उतराई होणे शक्य नाही, अशा भावना शरद निश्चळ यांनी व्यक्त करत शाळेची आठवण म्हणून शाळेला सोळा हजार रुपये किमतीचे तीन कपाट भेट दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ सुभाष बनकर, प्रभू बनकर, कल्याण बनकर, दत्तू बनकर, संतोष बनकर, रंगनाथ मुळे, कृष्णा ठोंबरे यांच्यासह शिक्षक बद्रीनाथ जायभाये, शालीकराम काकडे, विठ्ठल भुतेकर संध्या खिराडे, नारायण तांबेकर, राम दास डिघोळे आदींनी परिश्रम घेतले. संचलन जगन बुरकुल, तर आभार गजानन गायकवाड यांनी मानले. यावेळी डोणगाव केंद्रातील शिक्षक उपस्थित होते.

## भक्ती, परंपरा आणि आनंदाने भारलेली दिंडी

### पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** जुना जालना भागातील संस्कार प्रबोधिनी शाळेतील पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार हा दिवस एक खास, संस्मरणीय आणि भक्तिरसाने भरलेला ठरला. शाळेच्या वतीने जालना शहराचे आराध्य दैवत असलेले श्री. आनंदी स्वामी मंदिरात पारंपरिक दिंडी सोहळा नेण्यात आला. पारंपरिक पोशाखात सजलेल्या चिमुकल्या वारकर्यांनी टाळ, मृदंग, पावल्यांच्या तालात भक्तिभावाने पुढे वाटचाल केली. वातावरण भक्तीमय आणि मंगलमय झाले होते.

दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी पारंपरिक पावली, फुगड्या, विविध प्रकारची पालखी सजावट, लाठी-काठीचे आकर्षक प्रात्यक्षिक मुळे वातावरण भारावून गेले. मंदिराच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी मनोभावे सादर केलेल्या अभंगगायनाने तर सर्वांचेच अंत:करण पुलकित झाले. या उपक्रमामागे विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव जागवणे, आपल्या संस्कृतीची ओळख करून देणे, तसेच लोककलांविषयी आत्मीयता निर्माण करणे हा प्रमुख उद्देश होता. आणि तो विद्यार्थ्यांनी अत्यंत सुंदर पद्धतीने साकारला. या सुंदर दिंडी सोहळ्याचे आयोजन आणि मार्गदर्शन वर्ग पाचवी व सहावीचे शिक्षकवृंद अनिता रावस, कैलास शिंदे, भागवत मराठे, प्रशांत बोधक,



सुवर्णा पाठक, तसेच शिवनंदा बोबडे या सर्वांनी केले होते. शाळेच्या इतिहासात अशी दिंडी ही केवळ एक परंपरा नसून विद्यार्थ्यांच्या मनावर कोरली गेलेली एक संस्कारमय आणि आनंददायी आठवण बनून राहिली.

# संपादकीय पान

## फसवणुकीचा नवा मार्ग

सध्याचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट आज जीवनावश्यक गरज बनली आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेट चे स्वरूप जसे विस्तारित गेले तसे ऑनलाइन गुन्हेगारीही विस्तारित गेली. ऑनलाइन गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांची सायबर शाखा सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे असे असतानाही ऑनलाइन गुन्हे करणारे नवनवीन मार्ग शोधून सर्वसामान्यांची आर्थिक फसवणूक करत असतात. या फसवणुकीला केवळ सर्वसामान्य नागरिकच नाही तर नोकरदार, व्यावसायिक, डॉक्टर, वकील, इंजिनियर या सारखे प्रतिष्ठित नागरिक ही बळी पडतात. या सायबर गुन्हेगारांनी आता फसवणुकीचा मार्ग शोधून काढला आहे. तो आहे सेक्सटॉर्शन. अलीकडच्या काळात ऑनलाइन लैंगिक छळाचे प्रमाण वाढले आहे त्यातूनच हा शब्द निर्माण झाला आहे. अक्स्टॉर्शन म्हणजे खंडणी तसाच लैंगिक खंडणी म्हणजे सेक्सटॉर्शन. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटचा यासाठी वापर केला जातो. सोशल मीडियाच्या फेसबुक अकाउंटवरुन तुम्हाला एका अनोळखी मुलीची फ्रेंड रिक्वेस्ट येते. ती फ्रेंड रिक्वेस्ट माहिती न घेता स्वीकारली जाते. नंतर मेसेंजरच्या माध्यमतातून चॅटिंग केली जाते. त्यानंतर एकमेकांचे व्हाट्सएप नंबर घेऊन व्हाट्सएपवर चॅटिंग होते. चॅटिंग बरोबरच व्हिडीओ कॉल, व्हाट्सएप कॉल करण्यास सुरुवात होते. समोरची व्यक्ती अंगप्रदर्शन करून अश्लील हावभाव करते. समोरच्या व्यक्तीला मोहात अडकवले जाते. त्याला प्रोत्साहन देऊन त्याच्याकडून विवस्त्र अश्लील बाबी करून घेतल्या जातात. विशेष म्हणजे या सर्वांचे व्हिडीओ ऑन स्क्रीन रेकॉर्ड केले जाते. त्यानंतर काही दिवसांच्या फरकाने तुम्हाला मेसेज, फोन कॉल करून पैशांची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास तुमचा अश्लील व्हिडीओ व्हायरल करून बदनाम करण्याची धमकी दिली जाते. अशा प्रकारे लैंगिक खंडणी सेक्सटॉर्शनची मागणी केली जाते. यात प्रामुख्याने कॉलेजमधील विद्यार्थी व समाजातील प्रतिष्ठित नागरिकांना टार्गेट केले जाते. यात फसणारे बदनामीला घाबरून या सायबर गुन्हेगारांना हवी ती रक्कम देतात. बऱ्याचदा रक्कम देऊनही पुन्हा मागणी केली जाते. त्यामुळे फसवले गेलेले मानसिक तणावात येतात त्यातून ते आत्महत्येचा मार्गही स्वीकारतात. या प्रकाराला बळी पडून काही जणांनी आत्महत्या केल्याच्या घटनाही घडल्या आहेत. सेक्सटॉर्शन हा पैसे कमावण्याचा नवा मार्ग सायबर गुन्हेगारांनी शोधून काढला आहे. या सायबर गुन्हेगारांना पकडणे सायबर पोलिसांसाठी मोठे आव्हान बनले आहे कारण हे गुन्हेगार राज्याबाहेर किंवा देशाबाहेरचेही असू शकतात. या सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकू नये यासाठी सोशल मीडियाचा वापर करताना सावधगिरी बाळगायला हवी. कोणाचीही अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. आपली फ्रेंड लिस्ट आणि फॉलोअर्स वाढवण्याचा अट्टाहास आपले आर्थिक व मानसिक नुकसान करू शकतो. आजची तरुणाई सोशल मीडियाची मोठी फॅन बनली आहे. इंटरनेट, मोबाईल ही तरुणांची जीवनावश्यक गरज बनली आहे. मात्र याचा वापर समाजहिताच्या गोष्टी जोपासण्यासाठी झाला तरच उत्तम नाहीतर तुमची एक चूक तुमच्या जिवावरही बेतू शकते. म्हणूनच प्रत्येकाने सावधगिरी बाळगून सोशल मीडियाचा वापर करावा.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# सेवाभावी देवेंद्र भुजबळ

भारत सरकारच्या मुंबई दूरदर्शन केंद्रात निर्माता, महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात संचालक म्हणून आणि सेवानिवृत्तीनंतर आता न्यूज स्टोरी टुडे पोर्टलचे संपादक म्हणून अशी ४० वर्ष प्रसार माध्यमात सक्रिय असलेले, मुळचे विदर्भातील अकोला येथील असलेले देवेंद्र भुजबळ यांचा जन्म ४ जुलै १९६० रोजी संगमनेर येथे;आजोळी झाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा लेखप्रपंच.




देवेंद्र भुजबळ यांनी आर्थिकदृष्ट्या आकर्षक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या सोडून विचारपूर्वक माध्यम क्षेत्र निवडले.नगर येथील दैनिक समाचारमध्ये उपसंपादक कम वार्ताहर, पुणे येथील दैनिक केसरी मध्ये उपसंपादक, साप्ताहिक सह्याद्रीमध्ये विशेष प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केले.

दूरदर्शनच्या सहा वर्षांच्या सेवा काळात भुजबळ यांनी अनेक कार्यक्रम,माहितीपट,दूरदर्शन वृत्तांत निर्माण केले.अनेक कार्यक्रमांच्या निर्मितीत योगदान दिले .संहिता लेखन केले.काही कार्यक्रमात सहभाग घेतला . पुढे दूरदर्शन सोडून महाराष्ट्र शासनाच्या सेवेत आल्यावर त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या दूरदर्शनवरील शिवशाही आपल्या दारी या २४ भागांच्या मालिकेच्या, सोमवार ते शुक्रवार अशा दीड वर्षे प्रसारित झालेल्या माय मराठी कार्यक्रमाच्या, तसेच मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रसंगी योग्य वातावरण निर्मिती करण्यासाठी दूरदर्शनवर चालविल्या गेलेल्या मोहिमेच्या निर्मिती आणि प्रसारणात समन्वयक अधिकारी म्हणून महत्वाची भूमिका बजावली.


दूरदर्शनच्या गाजलेल्या महाचर्चा कार्यक्रमाचे ते ४ वर्षे रिसर्च अँड रिसोर्स पर्सन होते. आकाशवाणी वरील महाराष्ट्र शासनाच्या दिलखुलास कार्यक्रमाच्या पहिल्या ५०० भागांचे ते टीमलीडर होते. आकाशवाणीच्या काही कार्यक्रमांमध्ये देखील त्यांनी सहभाग घेतला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महान्यूज वेबपोर्टलसाठी 'करिअरनामा' हे सदर भुजबळ यांनी सुरू केले . या सदरासाठी ते स्वतः नियमित लेखन करीत असत. त्यांचे हे लेख विविध वृत्तपत्रातूनही प्रसिद्ध होत.

ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे झालेल्या चौथ्या विश्व सावरकर साहित्य संमेलनात भुजबळ यांचे स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता या विषयावर झालेले व्याख्यान विशेष गाजले. मलेशियातील चौथ्या विश्व शब्द साहित्य संमेलनाचे ते उद्घाटक होते.या बरोबरच त्यांची विविध ठिकाणी संवाद सत्रे झाली आहेत.दोन वर्षांपूर्वी अमेरिकेत असताना,त्यांचे शिकागो मराठी मंडळाने स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

देवेंद्र भुजबळ हे विविध विषयांवर सातत्याने लिहीत असतात.तसेच विविध विषयांवर व्याख्याने देखील देत असतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता हा त्यांचा संशोधनपर लेख मराठी बरोबरच हिंदी, इंग्रजी, गुजराती, ऊर्दू भाषेतही प्रसिद्ध झाला आहे. साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक नाट्य, चित्रपट , दूरदर्शन, प्रसार माध्यमे यात देवेंद्र भुजबळ सतत कार्यरत असतात. समाजातील दुर्बल घटकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थांसाठीही ते काम करत असतात.

गणित आणि विज्ञान विषयांची नावड त्यात बिकट कौटुंबिक परिस्थितीमुळे दहावीत नापास झाल्यामुळे त्यांना दोन वर्षे शिक्षणापासून दूर रहावे लागले . पुढे पडेल ते काम करत ते शिकले.देवेंद्र भुजबळ हे पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रा. एल. एन. गोखले पाठ्यवृत्तीचे सर्व प्रथम मानकरी ठरले. तर मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागाच्या मास्टर्स पदवीत


तत्कालीन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते आम्ही अधिकारी झालो या पुस्तकाचे प्रकाशन

ते प्रथम श्रेणीत सर्व प्रथम आले. भारत सरकारच्या फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट, इंडीयन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन,महाराष्ट्र शासनाच्या यशदा या संस्थांचे माध्यम अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी त्यांना त्या त्या सरकारांच्या नोकरीत असताना मिळाली.


तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उत्कृष्ट पोर्टल चे संपादक म्हणून चौथा स्तंभ हा राज्यस्तरीय पुरस्कार स्वीकारताना देवेंद्र भुजबळ.

भुजबळ यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार, मान सन्मान मिळाले आहेत. नुकताच त्यांना मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे इंडिया टुडे वृत्तवाहिनीचे सल्लागार संपादक राजदीप सरदेसाई यांच्या हस्ते त्यांना सभासदत्व बहाल करण्याचा सन्मान झाला.

**भुजबळ यांची आता पर्यंत** भावलेली व्यक्तिमत्वे, गगनभरारी, प्रेरणेचे प्रवासी, स्वातंत्र्यवीर सावरकरांची जाज्वल्य पत्रकारिता, करिअरच्या नव्या दिशा, अभिमानाची लेणी, समराजभूषण,आम्ही अधिकारी झालो ,ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. शासकीय सेवेत असताना, शासनाच्या विविध प्रकाशनांचे त्यांनी संपादन केले आहे. तर निवृत्ती नंतर न्यूज स्टोरी टुडे पब्लिकेशन्स साठी जीवनप्रवास समाजभूषण २ मी,पोलीस अधिकारी पौर्णिमानंद :(काव्य संग्रह) अजिंक्यवीर अंधारयात्रीचे स्वप्न चंद्रकला कादंबरी,
हुंदके सामाजिक वेदनेचे मी शिल्पा, सत्तरीतील सेल्फी या पुस्तकांचे संपादन केले आहे.
त्यांची नर्मदा परिक्रमा मी वाचलेली पुस्तके अमेरिका अमेरिका माहितीतील आठवणी, बाबासाहेब आणि आम्ही ही आगामी प्रकाशने आहेत.

देवेंद्र भुजबळ यांना त्यांच्या या प्रसार माध्यमाच्या कार्यात त्यांच्या पत्नी सौ. अलका भुजबळ या चांगल्या सहकार्य करतात. त्यांचे कॉमा हे पुस्तक लवकरच प्रकाशित होणार असून या पुस्तकामध्ये त्यांनी कॅन्सरवर यशस्वीरित्या मात केल्याचे प्रेरणादायी अनुभव कथन केले आहे.

नवी मुंबई सानपाडा येथील मिलेनियम टॉवर मध्ये राहणारे देवेंद्र भुजबळ व सौ अलका भुजबळ ही जोडी न्यूज स्टोरी टुडे पोर्टल या प्रसार माध्यमातून अनेकांचे सामाजिक कार्य प्रसिद्धी झोतात आणीत आहेत. देवेंद्र भुजबळ व सौ. अलका भुजबळ या दाम्पत्याच्या सामाजिक कार्याला सलाम.

**मारुती विश्वासराव**
**नवी मुंबई. ९८६९०२०८५८**

# जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.११ जुलै २०२५ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/ व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगा बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅप्रीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.११ जुलै २०२५ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

पान १ वरुन

## मराठवाडा शिक्षक ...

आयोजित आंदोलनाची नोंद घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव आणि सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे,जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे जिल्हा सचिव संजय येळवंते, केंद्रीय कार्यकारीनी सदस्य प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी, कार्याध्यक्ष फरखुंद अली सय्यद कुरेशी, जिल्हा उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, जगन वाघमोडे, कोषाध्यक्ष नारायण मुंडे, सहसचिव गणेश चव्हाण, प्रद्युम्न काकड, दीपक शेरे, सदस्य तुकाराम पडघन, तालुकाध्यक्ष रमेश गाढे, आनंद वाघ, विजयकुमार खरात,शिवहरी कायंदे, बि डी शेख,सुनील म्हस्के, महिला आघाडी शहराध्यक्ष ज्योती पांगारकर, युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, तालुका सचिव गणेश मेहेत्रे बी टी लंके, जनार्दन कुदर, राधेश्याम चौधरी, संजय चव्हाण, मार्गदर्शक डॉ मारोती तेगमपुरे, पुरुषोत्तम जुने, प्रा दत्ता देशमुख, अनंत जायभाये, प्रसिद्धी प्रमुख हकीम पटेल, भगवान धनगे यांनी केली आहे.

## रिक्षात राहिलेला ...

आली असता. पोलिसांनी त्यांना हरवलेल्या मोबाईल दाखविला. तो मोबाईल पाहून त्या व्यक्तीचा चेहऱ्यावर आपसूकच हास्य फुलले. पोलिसांनी वेळ न दवडता किशोर धडके आणि त्या व्यक्तीची भेट घडवून आणली. किशोर धडके यांचा प्रामाणिकपणा पाहून त्या व्यक्तीने किशोर धडके यांना अकरा हजारांचेचे बक्षीस दिले.

किशोर धडके यांनी सव्वा लाखाचा आय फोन परत केल्याने पोलिसानी त्यांना शाबासकी दिले. याकामी त्यांना गणेश पाटील, अविनाश पोळ या मित्रांची मदत झाली.

## माहेश्वरी समाजातील ...

रणजीत शंकरलाल काबरा राजुर, सतीश विजयकुमार काबरा टेंभुर्णी, डॉक्टर विजय जेथलिया, अशोक सखाराम जी काबरा जालना, नेहा काबरा खंडाळे, रुचिका काबरा मामडे नांदेड, कृष्णा काबरा पुणे, प्राध्यापक दत्ता देशमुख टेंभुर्णीकर, बरंडवाल गायकवाड टेंभुर्णी यांच्याशी संपर्क करून स्कॉलरशिप साठी मागणी करावी.

# हिंदू; ५० वर्षांनंतर कसा असेल ?

माहेश्वरी समाज: घटती लोकसंख्या, समस्या व उपाय हा अत्यंत अभ्यासपूर्ण , चिंतनशील लेख नुकताच माझ्या वाचनात आला. लेखकाने अतिशय संशोधन करून,विविध आकडेवारी देऊन हा लेख लिहिलेला असल्यामुळे लेखाचे गांभीर्य लक्षात येते.

माहेश्वरी समाज हा प्रामुख्याने उद्योग,व्यवसाय करणारा, आर्थिकदृष्ट्या सक्षम, शांतताप्रिय समाज म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या समाजाची लोकसंख्या कमी होत चालली आहे,ही केवळ त्या समाजाचीच समस्या नसून ती राष्ट्रीय समस्या म्हणून पाहिली पाहिजे. या समस्येवर उत्तरे शोधण्यासाठी सामाजिक स्तरावर विचार मंथन आणि उपाययोजना करण्याचे प्रयत्न सुरू आहेत,ही स्वागतार्ह बाब आहे.

खरं म्हणजे लग्न उशीरा करणे,किंवा लग्नच न करणे, केलेच तर करिअर आणि किंवा अन्य कारणांमुळे मूल होऊ न देणे अशा स्वरूपाच्या समस्या हिंदू धर्माच्या अन्य समाजांना देखील भेडसावत आहेत.या प्रकरणी हिंदू धर्माच्या देश विदेशातील धुरिणांनी,सर्व संघटनांनी, भारत सरकारने सुद्धा लक्ष घालणं आवश्यक असून, या बाबतीत अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशा काय उपाय योजना करता येऊ शकतील याचा विचार



केला पाहिजे.

आज जगात युनोशी संलग्न असलेले एकूण १९५ देश आहेत.त्यापैकी १५७ देश हे ख्रिश्चन धर्मियांची बहुसंख्या असलेले आहेत. ५७ देश हे इस्लाम धर्मियांची बहुसंख्या असलेले आहेत.जगाची सध्याची लोकसंख्या ८०० कोटी इतकी आहे.त्यात ख्रिश्चन धर्मिय ३१.५१ टक्के, इस्लाम धर्मिय २३.१८ टक्के, अन्य धर्मीय १६.३३ टक्के तर हिंदू धर्मीय १४.९८टक्के , म्हणजेच सर्वात कमी लोकसंख्या असलेले आहेत. खरं म्हणजे हिंदू धर्म हा सनातन धर्म आहे. ती एक संस्कृती,जीवन प्रणाली आहे. इतर सर्व धर्म हे हिंदू धर्माच्या नंतर उदयास आलेले आहेत. कोणे एकेकाळी अर्धे जग हे हिंदुमय होते. जगातील सर्वात मोठे हिंदू मंदिर हे कंबोडिया देशात आहे. थायलंड देशाच्या बँकॉक या राजधानीच्या ठिकाणी असलेल्या विमानतळाचे नाव, सुवर्णभूमी आहे.मलेशियातील काही शहरांची नावे,संस्कृती, चालीरीती,त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला असला तरी आजही प्रामुख्याने हिंदू पद्धतीप्रमाणे आहेत. इतर धर्म,त्या धर्मांचे अनुयायी हे नेहमीच विस्तारवादी, आक्रमक राहिलेले आहेत. तर हिंदू धर्म हा सहिष्णू, इतर धर्मियांच्या भावनांचा आदर करणारा असा राहिला आहे आणि अजूनही तो तसाच आहे.परंतु याचा फटका जगातील हिंदू लोकसंख्येवर होत आहे. त्यामुळे ही जागतिक समस्या असून जगभरातील हिंदू धर्माच्या धुरिणांनी एकत्र येऊन या समस्येवर विचार विनिमय करून उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा माहेश्वरी समाजावरील लेखात ५० वर्षांनंतर माहेश्वरी समाज अस्तित्वात राहणार नाही,अशी जी सार्थ भिती व्यक्त केली आहे,तीच भीती दुर्दैवाने हिंदू धर्माविषयी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून या दृष्टीने सर्वंकष विचार विनिमय करून काही तातडीच्या तर काही दीर्घकालीन उपाययोजना करण्याची नितांत गरज आहे.शेवटी विचारातूनच कृती घडत असते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

**देवेंद्र भुजबळ.**
**९८६९४८४८००**

# पंढरपुरातील वैष्णवांचा सोहळा पाहण्यासाठी टेंभुर्णीचे वारकरी पंढरपूरकडे रवाना

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - डोईवर असलेली शेतीची कामे बाजूला सारून जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील महिलांना दरवर्षी नित्यनेमाने विठुमाईच्या पंढरीकडे ओढ लागते. याच विठूभक्तीच्या ओढीतून पावले आपोआप पंढरीकडे वळतात, असे मत बुधवारी (ता. दोन) सकाळी पंढरपूरकडे रवाना झालेल्या महिलांनी व्यक्त केले. वर्षभर शेतात राबणाऱ्या शोभाबाई उखर्डे, द्वारकाबाई धनवई, साखराबई उखर्डे, शीला उखर्डे, कासाबाई सपकाळ, सुलाबाई उखर्डे, सुमनबाई उखर्डे, वैष्णवी उखर्डे या वीस वर्षांपासून पांडुरंगाच्या भेटीसाठी आवर्जून जातात. माउलीच्या दिंडी सोहळ्यात शेतीकामामुळे सहभागी होता येत नाही; परंतु शेवटचे पाच ते सात दिवस दिंडीमध्ये सहभागी होऊन आपण विठ्ठलाच्या दर्शनासाठी जात असल्याचे महिलांनी सांगितले.




या महिलांसोबत सांडू महाराज उखर्डे, संपत माउली उखर्डे ही मंडळी जाते. वर्षभर शेतीकामात व्यस्त असले, तरी भगवंताच्या भेटीसाठी वर्षातील पाच ते सात दिवस दिंडीत सहभाग असतो. पांडुरंगाच्या दर्शनानंतर मनाला एक आत्मिक समाधान लाभत असल्याचे सुलाबाई उखर्डे यांनी सांगितले. वैष्णवांचा सोहळा हृदयात सामावून घेण्यासाठी पंढरपूरची वारी एक नवी उमेद मनात निर्माण करते. याच माध्यमातून शेतीतील कामे बाजूला सारून दरवर्षी आपण विठ्ठलाच्या दर्शनाला जात असल्याचे कासाबाई सपकाळ यांनी सांगितले.

समाजातील वयोवृद्ध महिला पांडुरंगाच्या भेटीसाठी जात असल्याने सोहळ्यातील गर्दीमध्ये त्यांना साथ लाभावी. त्यामुळे दरवर्षी आम्ही त्यांच्यासोबत वारी करतो. पंढरपुरातील वैष्णवांचा सोहळा, वर्षभरातील कामांसाठी नवी ऊर्जा निर्माण करतो. भगवंताच्या दर्शनाची ओढ आपोआप पंढरीकडे जाण्यासाठी प्रेरित करते. आम्हा वारकऱ्यांना शक्ती निर्माण करतो. भक्तीचा गर्भित अर्थ लोकांना कळतो. आत्मशांतीसाठी ही हा सोहळा अत्यंत महत्त्वाचा असून विठ्ठल नामा ने भक्ती रसात रंगून जातो त्यासाठी हा भक्ती सोहळा पाहण्यासाठी पंढरपूरच्या विठुरायाच्या दर्शनासाठी आम्ही सर्व वारकरी जात असतो.

## टेंभुर्णी येथे जगन्नाथ रथयात्रेचा उत्सव संपन्न

**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे प्रभु जगन्नाथ रथयात्रा सलग तिसऱ्या वर्षी मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. आंबेगाव रोडवरून या रथयात्रेची सुरूवात करण्यात आली, त्यात शहरातील आबालवृद्ध महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले व हरे कृष्णा हरे रामा हरि बोल या घोषणांनी संपूर्ण शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते. सावता महाराज मंगल कार्यालयात यात्रेचा समारोप करताना प्रभु राम गोविंद व नाशिकहून मुद्दामच सहभागी झालेले प्रभु डॉ संजीवन देवधर यांनी रथयात्रेचं महत्त्व व मानवी जीवनावर भगवान श्रीकृष्ण भक्तीचा कसा उपयोग होतो व जीवन कसे धन्य होते याबाबत सविस्तर उदाहरणे देऊन विवेचन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भगवान श्रीकृष्ण यांच्या मूर्तीवर पंचामृताने अभिषेक करण्यात आला आणि ५६ प्रकारच्या मिठाया व प्रसादाचा भोग अर्पण केला. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. रथयात्रेच्या आयोजनासाठी स्थानिक इस्कॉन शाखेचे अध्यक्ष दिगंबर प्रभु, मंगेश प्रभु व खलसे कुटुंबातील सर्व सदस्यांचा सिंहांचा वाटा असतो.




# व्यसनामुळे संसार होतोय उद्ध्वस्त

आजच्या बदलत्या युगात नवतरुण पिढी व्यसनाधीन होतांना दिसत आहे, तसेच दारूच्या व्यसनापायी अनेक लोकांचे हसते-खेळते संसार उद्ध्वस्त झाले आहेत.आपण पुर्वीपासून बघत आलो आहोत की दारु असेल किंवा कोणतेही व्यसन असु द्या हि सवय म्हणजे चांगला संसार चाललेल्या गाडीची खीळ काढणे होय असंच म्हणावं लागेल .आपण रात्र दिवस कष्ट करून जगणे हि आपलीं परंपरा कायम राहीली आहे ,या मध्ये जर मुख्य कारभार सांभाळणारा जर व्यसनी असला तर समजून घ्या.आपण एवढी मेहनत करूनही काही उपयोग नाही,आपण आता पर्यंत काही आठवणी मधील काही किस्से बघीतले असतील बायको कामाला जाते आणि हा तीच्या माघारी कुठे तरी दोस्त मित्राच्या नादी लागून पत्ता,वरली,मटका उसनवारी करून जुगार खेळत दिवस भर वेळ वाया घालवत घरी जातो आणि आपल्या मुलांना धमकावून सांगत म्हणतो मम्मी घरी आल्यावर जर सांगितले पप्पा घरी होते आणि जुगार खेळत होते तर बघा मग काय होइल?मुलं घाबरत गप्प बसतात आणि असं चालत बरेच काही दिवसांनी बायकोला माहीत होतं आणि आपले मुल घरी ठेवून एक दिवशी अचानक माहेरी निघून जाण्याचा निर्णय घेते, त्या नंतर तिचा पती रागाने लालबुंद होउन घरातील काही वस्तू विकून घराची उधळण करीत होता, मुलांची जेवण्याची गैरसोय होत होती, मुलं सारखीच मम्मी ला आठवण करत असायची हा प्रकार लक्षात येताच शेजारच्या मैत्रीन ने त्या माहेरी निघून गेलेल्या बाईला फोन केला.घरी अस चाललंय म्हणून ती सावराआवरा करतं घरी येते आणि बघते घराची व मुलं बाळांची काय अवस्था झाली.हा मनस्ताप सहन होईना म्हणून मुलांचाही विचार न करता विष प्राशन करून आपला जीव गमावला.किती अवघड होते या सवयीमुळे तरीही लोकांना समजतं कसं नाही.आताच काही दिवसांपूर्वी एका तरूणाने ऑनलाइन रम्मीचा नादात झालेल्या कर्जबाजारीपणातून स्वतः च्या पोटच्या गोळ्यासह संपूर्ण कुटुंबाला संपवलंय.

धाराशिव जिल्ह्यातील बावी या गावातील लक्ष्मण जाधव नामक ट्रॅक्टर चालकाने बायको अन् मुलाला आधी संपवले अन् नंतर स्वतःचा जीव घेतला असल्याची शक्यता आहे.. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार मयत ट्रॅक्टर चालकास ऑनलाइन रम्मी खेळण्याचा नाद लागला होता..

यामुळेच त्याची आर्थिक परिस्थिती बिकट झाली अन् त्यांनी नैराश्यातून आधी कुटुंबाला नंतर स्वतःला संपवून घेतले.

त्यामुळे कोणीही ऑनलाइन रम्मी सारख्या जुगाराच्या नादी लागू नये.. सुखाची अन् कष्टाची भाकर आयुष्यभर पुरते मात्र जुगार, सट्टा, मटका अन्, सिगारेट ,गुटखा, दारू आपला व आपल्या कुटुंबाचा अंत खूप वाईट करून टाकतो.. दारू विषयावर बोलायचे झाले तर दारू हे एक व्यसन आहे आणि यामुळे कुटुंब उध्वस्त होऊ शकते हे माहिती असूनसुद्धा लोकं दारू का पितात? हे समजत नाही लालच बुरी बला है!

असं गृहीत धरा की एक माणूस आहे. तो दररोज काहीतरी काम करतो पण त्या कामाचा मोबदला त्याला भेटत नाही. पण तो सुखी आहे. त्या कामाच्या मोबदल्यावाचून त्याचे काहीही अडलेले नाही. त्याचे आयुष्य अगदी छान सुरू आहे.

एक दिवस कोणीतरी त्या माणसाला त्याच्या कामाच्या बदल्यात थोडे पैसे देतं. तो माणूस खुश होतो. जास्तीच्या पैशातून मजा करतो. पुन्हा त्याचं काम सुरू करतो. त्याला पुन्हा एकदा कामाच्या बदल्यात पैसे मिळतात. तो पुन्हा थोडी मजा करतो आणि पुन्हा कामाला लागतो. हे असे बराच काळ सुरू राहतं.

पण एक वेळ अशी येते की त्या माणसाला पैसे मिळाल्याशिवाय काम करावेच वाटत नाही. मग त्याचे आयुष्य बिघडत जाते.

दारूमुळे मेंदू मोठ्या प्रमाणात काही वेळासाठी पडतो किंवा स्टँड बाय मोड मधे असतो त्यामुळे त्यातील विचारांचे द्वंद्व , घर्षण पण थांबते आणि दारुड्याला मोकळे , बरे वाटते। व्यसन हे सवय असतें। लांबवर सहज गतीने चालण्याने पण मेंदूला बरे वाटते। त्याची सवय केली तर ते पण व्यसन होते। दारूचे व्यसन वाढले तर शरीर, संसार , अर्थ , संपदा , कामधंदा, क्षमता, , लैंगिक शक्ती याचा नाश करते! चालण्याचे व्यसन मात्र उत्साह, आरोग्य व संपदा देतं.

दारू पिल्यानंतर आपल्याला अप्रिय असणाऱ्या किंवा त्रास देणाऱ्या घटना विसरायला मदत होते असे दारू पिणारे लोक सांगतात.

मद्य, नशा आणणारे इतर पदार्थ, तंबाखू, सिगरेट यांचे व्यसन लागते तसेच सातत्याने सोईप्रमाणे खोटे बोलणे गैरसमज पसरविणे या कृती सुद्धा व्यसने समजावी ,

माझ्यासोबत पदवी अभ्यासक्रमात शिकणाऱ्या एका मुलाला दारू आणि सिगरेटच व्यसनं लागलं होतं. तो शिक्षणासाठी घरापासून दूर आल्यामुळे घरी याबद्दल माहिती नव्हती. एक दिवस त्याचे वडील काही सामान घेऊन त्याला भेटायला आले. पाहतात तर काय? त्याच्या खोलीत दारूच्या बाटल्यांची गर्दी होती. राग, चिंता, हतबलता असं बरंच काही ते त्या क्षणी अनुभवत होते. पण ते आपल्या मुलाला काहीच बोलले नाही. सामान देऊन निघुन गेले.

मुलाला वाटलं आपल्या वडिलांना काहीच लक्षात आले नाही. आपल्या व्यसनाबद्दल त्यांना माहीत नाही आणि तो अगदी खुश झाला. पण दोन आठवड्यानंतर तो घरी गेला तेव्हा खरी गंमत घडली.

वडील आपल्या मुलाला घेऊन एका गल्लीत गेले. तेथे खूप कचरा साचला होता, तुटलेली घरें होती, काही लोक रस्त्यावर झोपली होती. त्यातील एका माणसाला उठवून वडील बोलण्याचा प्रयत्न करत होते. पण तो माणूस शुध्दीवर नव्हता, दारूच्या नशेत होता.

वडील- या माणसाला ओळखले का तु?

मुलगा- नाही बाबा.

वडील- अरे माझा जुना मित्रांसोबतचा फोटो नाही का, त्यातला हा सुरेश. मी गेली अनेक वर्षे सुरेश सोबत बोललोच नाही आहे. आमची मैत्री पदवी अभ्यासक्रमातील दुसऱ्या वर्षी तुटली.

मुलगा- का बाबा?

वडील- सुरेशनी मला दारू पिण्यासाठी आग्रह केला. मी नाही म्हटलं तर मला नको नको ते बोलला. मी तेव्हाच सांगितले की मला दारू नको आणि दारू पिणारे मित्रही नको. आज बघ त्याची काय स्थिती झाली आहे. तुच सांग व्यसन महत्त्वाचे की जिवन?

मुलगा काहीच नाही बोलला पण त्याची चुक त्यांच्या लक्षात आली. आज तो निर्व्यसनी आणि आनंदी जीवन जगत आहे.

तुम्ही तुमच्या मुलाला व्यसनामुळे काय अधोगती होते याची जाणीव करून दिली पाहिजे. कधी कधी मुलांना ते भविष्यात कसे असतील हे आताच्या त्यांच्या वर्तनावर अवलंबून आहे हे समजावून सांगण्याची गरज असते. रागाच्या भरात काही करु नका. तुमच्या मुलाच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा आणि व्यसनमुक्ती मध्ये त्याला मदत करा. तुमच्या मुलाला तुमच्या पाठिंब्याची गरज आहे.मि निर्व्यसनी लोकांना एवढंच सांगेल की तुम्ही

समाजा समोर आदर्श आहात.

कारण आज कोणतेही व्यसन नसणे हे फार दुर्मिळ होत चालेल आहे. मुळात व्यसन नसावे याचे व्यसन असावे हे तुम्हाला आहे.

मी हि त्यातला एक. मला कोणतेही व्यसन नाही. दारू, सिगारेट, पान ,तंबाखू अगदी चहा चे हि व्यसन मला नाही.

निर्व्यसनी राहण्याने सर्वात मोठा फायदा हा कि तुम्ही तुमच्या कुटुंबाशी प्रामाणिक व एकनिष्ठ राहता. कुटुंबाला जास्त वेळ देऊ शकता. पैशाची बचत होतेच पण मुख्य म्हणचे कुटुंब सुखी आणि निरोगी राहते.

मोठयांन समोर तुम्ही गुणी ठरता व लहानांसमोर तुम्ही आदर्श ठरता. समाजात तुमची आणि तुमच्या कुटुंबाची प्रतिष्ठा व मान सन्मान वाढते.



मोठं मोठ्या आजारानं पासून तुम्ही दूर राहता.

असेच निर्व्यसनी राहा, निरोगी आणि सुखी राहा.

लेख वाचत असताना कुणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर माफ करा.

**शिवाजी पुंजाराम खंदारे**
**मंठा जिल्हा जालना**
**८७६६८८५७७२**

## अंशतः अनुदानित शिक्षकांसाठी असंवेदनशील सरकारला पाझर फुटेना

**शिक्षकांचे राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन**

**जाफ्राबाद । प्रतिनिधी** - दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयास निधीची तरतूद करून तात्काळ अंमलबजावणी करावी या मागणीसाठी शिक्षक समन्वय संघाचे दिनांक ५ जून पासून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन सुरू असून या आंदोलनाची अद्यापही राज्य शासनाने दखल न घेतल्याने तसेच दिनांक ३० जून रोजी पुरवणी मागण्यांमध्ये या शासन निर्णयासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद न केल्याने राज्यभरातील ६३ हजार शिक्षकांमध्ये असंतोष उफाळून आला आहे. या आंदोलनास पाठिंबा म्हणून राज्यातील प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच कनिष्ठ महाविद्यालय हे दिनांक ८ व ९ जुलै रोजी बंद ठेवण्याचा निर्णय शिक्षक समन्वय संघाच्या वतीने घेण्यात आला आहे.



यासंदर्भात जालना जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक यांना निवेदन सादर करण्यात आले असून या निवेदनात म्हटले आहे की जालना जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या व सर्व माध्यमाच्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय एक कडकडीत बंद राहणार आहे. यावेळी शिक्षक समन्वय संघाचे सदानंद लोखंडे, ज्ञानेश चव्हाण, विजय सुराशे, शंकर शेरे, संदीप इंगोले हे उपस्थित होते.

### बंद आंदोलनात सहभागी व्हाः लोखंडे

राज्य शासनाने पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयास तरतूद न केल्याने राज्यातील शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला असून म्हणून हे शाळा बंद आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनात जालना जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या व सर्व माध्यमाच्या अनुदानित अंशतः अनुदानित विनाअनुदानित व स्वयंअर्थ साहित शाळांनी सहभागी व्हावे असे आवाहन जालना जिल्हा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष सदानंद लोखंडे यांनी केले आहे.

# स्वामी विवेकानंद जगाच्या पाठीवरील तेजस्वी युगपुरुष

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला.स्वामी विवेकानंद यांची आवड आणि अभ्यास प्रगल्भ होता.त्यांना संगीत, साहित्य आणि तत्वज्ञान यात विशेष रस होता.याव्यतीरीक्त पोहणे, घोडेस्वारी व कुस्ती हे त्यांचे आवडते छंद होते. वयाच्या २५ व्या वर्षी स्वामीजींनी वेद,पुराण, बायबल, कुराण,धम्मपद,तनाख, गुरू ग्रंथ साहिब, दास कॅपिटल, भांडवलशाही, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या सर्वच विचारधारा अवगत केलेल्या होत्या.म्हणजे त्यांना इतर सर्व ज्ञान तर होतेच परंतु जगातील संपूर्ण धर्माचा अभ्यास त्यांनी अवगत केलेला होता.यावरून असे वाटते की स्वामी विवेकानंदांना संपूर्ण ब्रम्हांडाचे ज्ञान असल्याचे दिसून येते. याला दैवी शक्तीच म्हणावे लागेल.कालांतराने रामकृष्ण परमहंस यांच्या आश्रयाला गेले व रामकृष्ण परमहंस यांच्या रहस्यमय व्यक्तीतत्वाने ते अत्यंत प्रभावीत झाले आणि त्यांचे संपूर्ण जीवन बदलले.स्वामींनी १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांना आपले गुरू केले.१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्या मृत्यूनंतर स्वामी विवेकानंदांच्या कार्याला एक नवीन वळण आले.वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी भगवे वस्त्र धारण केले व संपूर्ण



भारतभर पायी प्रवास सुरू केला.देशातील गरीबी आणि सामाजिक दुष्टांची अवस्था पाहून त्यांची मनस्थिती दुःखावली गेली. काही दिवसांतच शिकागो येथे जगातील धर्म परिषद होणार असल्याची माहिती मिळाली.११ सप्टेंबर १८९३ ला शिकागो येथे जगातील धर्म परिषद भरली.भारताचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद तेथे पोहोचले. तिथे अनेकांनी खूप प्रयत्न केले की स्वामी विवेकानंद यांना बोलायला वेळ मिळुन नये.परंतु एका अमेरिकन प्राध्यापकाच्या प्रयत्नाने त्यांना बोलायला थोडा वेळ मिळाला.त्यानी जागतिक धर्म परिषदेतील धर्म संसदेतील भाषणाची सुरुवात बंधु व भगिनीअसे करून केली. यानंतर त्यांच्या भाषणाचे विचार ऐकून संपूर्ण धर्म परिषद स्तब्ध झाली व टाळ्यांचा कडकडाट झाला जनुकाय आकाशवाणी झाली की काय! आणि स्वामी विवेकानंद जगप्रसिद्ध झाले व त्यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत झाले. युगानुयुगे आपल्या तेजस्वी विचारांची ज्योत संपूर्ण जगात सकारात्मक व शांती प्रदान करणारी रहावी या उद्देशाने स्वामी विवेकानंद यांनी आपले कार्य पुढे सुरूच ठेवले. एकतेचा संदेश जगाला देऊन सर्व मानवजातीला बंधुतेचा, मानवतेचा संदेश देणारे व सुखशांती निर्माण करणारे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले. त्यांनी जगाचा इतिहास आणि पाश्चात तत्वज्ञानांचा अभ्यास महाविद्यालयीन जीवनातच केला. अनेक धर्माच्या तात्विक अभ्यासामुळे त्यांनी अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व त्यांनी केले. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीच्या त्यांच्या भाषणाने संपूर्ण सभा प्रभावित झाली व १७ दिवसाच्या या परिषदेत हिंदुस्थानातील प्रभाव दिसून आला.मुलांचा सर्वांगीण विकास व त्यांच्या कौशल्यांचा विकास व्हावा, मुले आत्मनिर्भर व्हावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यांच्या या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता आजच्या युवा पिढींनी अवगत करायला हवी. मूलांचा शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास होऊन मन,बुद्धी विकसित करणारे, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न ओळख निर्माण करणारे शिक्षण असावे असे त्यांचे मत होते. भारताच्या आध्यात्मिक संस्कृतीबद्दल गाड अभिमान असला, तरी त्यात शिरलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा, जातीभेद यांसारख्या हीन गोष्टींवर त्यांनी भाषणांतून कडाडून हल्ला चढवला. निराकार समाधीत मन रहाण्याची स्वतःची स्वाभाविक प्रवृत्ती बाजूला सारून त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सुखदुःखाचा योग्य पातळीवरही विचार केला आणि त्यांच्यासाठी झटले व सर्वस्वाचे समर्पण म्हणजेच खरा संन्यास' हे वचन सार्थ केले. स्वामी विवेकानंद हे सर्व तरुणांचे आजही प्रेरणास्थान आहेत. अशा या महान तत्त्वज्ञानी महापुरुषाला माझा सलाम.आज देशात आपल्याला जी काही एकता आणि बंधुता दिसून येत आहे त्याचे संपूर्ण श्रेय स्वामी विवेकानंदांना जाते.१८९९ साली स्वामीजींनी पुन्हा पश्चिमेकडे प्रवेश केला आणि भारतीय संस्कृतीचा, अध्यात्माचा संदेश प्रसारित केला.अशाप्रकारे परदेशातही त्यांनी भारताची भूमिका मांडण्याचे काम त्यांनी केले.असा तेजस्वी महापुरुष भारत भुमिला लाभला हे भारतीयांचे अहोभाग्यच आहे.आजही आपला देश स्वामी विवेकानंदांच्या विचारधारेवर चालतो ही भारतीयांसाठी स्वाभिमानाची बाब आहे.परंतु अचानक ४ जुलै १९०२ ला ३९ व्या वर्षी स्वामींची प्राणज्योत मालवली व भारतासह जगातील अनेक राष्ट्रांना धक्का बसला.कारण स्वामी अल्प वयात आपल्याला सोडून गेले आणि ज्ञानाची तेजस्वी जोत मावळली.अशा महापुरुषांनी पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावा असे आज सर्वांनाच वाटते.त्यामुळे आजही स्वामीजींची आस्था सर्वांच्या ह्रदयात घर करून आहे.मी संपूर्ण भारतवासीयांना विनंती करतो की स्वामी विवेकानंदांचे विचार अवश्य अवगत करावे. आपणा सर्वांचाच मार्ग सुखरूप व मोकळा होईल.जोपर्यंत सुर्य,चंद्र,तारे,आकाश-पाताळ,ग्रह-तारे आहेत तोपर्यंत स्वामीजींचे विचार सर्वांच्याच ह्रदयात राहिल. स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त सरकारने, सामाजिक संघटना, शाळा-महाविद्यायासह संपूर्ण युवावर्गानी आजच्या दिवशी वृक्षलागवड केली पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण मानव जातीला आणि प्राणीमात्रांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे अनेकांचे प्राण आपल्याला वाचविता येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात व जळामुळात आपल्याला स्वामींचे दर्शन अवश्य होईल.स्वामीच्या पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

## ओमर होमिओपॅथक मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे वैद्यकिय परिक्षेत घवघवीत यश




**परतूर । प्रतिनिधी -** ओमर होमिओपॅथक मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर रांजणी बि एच एम एस परिक्षेचा ९० टक्के निकाल रांजणी - घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील ओमर होमिओपॅथी मेडिकल कॉलेज,रिसर्च सेंटर च्या विद्यार्थ्यांनी बि एच एम एस २०२४ सीबीडीसी परिक्षेत ९० टक्के निकाल मिळवून शैक्षणिक यश प्राप्त केले.

राष्टीय होमिओपॅथी आयोगाने लागु केलेल्या नविन सीबीडीसी अभ्यासक्रमा अंतर्गत ही परिक्षा घेण्यात आली होती अशा बदलाच्या काळात मिळालेले हे यश संस्थेच्या गुणवत्तेची पातळी कठोर प्रशिक्षण आणि पोषक वातावरण याचे प्रतिक आहे . या साठी विविध विषयाचे प्राध्यापक ,डॉ.खतीब,डॉ. गर्जे ,डॉ.सिसोदिया,डॉ. हा जरा,डॉ.जव्वाद , डॉ. श्रुतीका ,डॉ. शाकीर ,डॉ. मुस्ताक अहेमद, ,डॉ.सय्येदा मसर्रत , डॉ. केदारे , यांच्या व विध्यार्थ्यांच्या कठीण परिश्रम ाचे कौतुक प्राचार्य, डॉ.हसीना म्हैशाळे मॅडम,यांनी केले .

विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी केलेल्या मेहनतीची प्रशंसा कॉलेज प्रशासन, संस्थेचे अध्यक्ष मौलाना हुजेफा वस्तानवी साहेब व स्थानिक विश्वस्त मौलाना नईम कासमी साहेब यांनी केले.गुणानुक्रमे प्रथम क्रमांक -महेक सय्यद इरशाद, द्वितीय क्रमांक - शेख सानिया रिझवानोद्दीन, तृतीय क्रमांक - सुमेय्या सय्यद युसुफ यांचा गौरव करण्यात आला .तसेच यांच्या यशामागे .विध्यार्थी ,प्राध्यापक ,कर्मचारी यांचा सर्वांचा मोठा सिहाचा वाटा आहे असे,प्राचार्या डॉ. हसीना म्हैशाळे मॅडम यांनी नमूद केले.

# एआय तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उत्पादनात वाढ - राजेंद्र पवार

### निमखेडा बु.येथे ऊस बागायतदार शेतकऱ्यांसाठी चर्चासत्र

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** उत्पादनात वाढ होण्यासाठी शेतकऱ्यांनी एआय तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उत्पादनात नक्कीच भर पडेल, असा विश्वास बाराम ती शुगर मिलचे चेअरमन राजेंद्र पवार यांनी व्यक्त केला.

जाफराबाद तालुक्यातील निमखेडा बु. येथील चर्चासत्रात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना पवार बोलत होते. के. व्ही. के. बारामती व मायक्रोसॉफ्ट, ऑक्सफर्ड विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने २ जुलै रोजी सकाळी ११ वाजेला निमखेडा बु. येथे ऊस उत्पादन वाढीसाठी चर्चासत्र कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऊस उत्पादन वाढीसाठी (कृत्रिम बुद्धिमत्ता) या तंत्रज्ञानाचा नक्कीच वापर करावा, कारण आज जग बदलत आहे. आपणही त्या प्रवाहात राहण्यासाठी बदल करणे आवश्यक आहे. जुन्या पारंपरिक पद्धतीने लागवड, खर्च व उत्पादन याचा ताळमेळ

बसत नसून, दिवसेंदिवस शेतकरी मेटाकुटीस येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नवीन नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून होणाऱ्या खर्चावर मर्यादा घालत उत्पादन कसे वाढेल, यावर चेअरमन राजेंद्र पवार मार्गदर्शन केले. तर माजी आमदार चंद्रकांत दानवे, गुळवे आबा यांनी देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर बारामती ॲग्रोचे चेअरमन राजेंद्र पवार, व्हाइस चेअरमन गुळवे आबा, माजी



आमदार चंद्रकांत दानवे, जाफराबाद नगराध्यक्षा सुरेखा लहाने, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष रामधन कळंबे, कलावती हॉस्पिटल जालनाचे संचालक डॉ. कृष्णा कोरडे, बारामती ॲग्रो कन्नडचे शेतकी अधिकारी पठाण व त्यांचा संपूर्ण कर्मचारी स्टाफ, शिक्षक संघटनेचे तालुका अध्यक्ष एकनाथ शेवत्रे, निमखेड बु. येथील सरपंच प्रभाकर चव्हाण, प्रगतशील शेतकरी गणेश चव्हाण यांच्यासह तालुक्यातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

## रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर शनिवारी जालन्यात

**जालना । प्रतिनिधी -** रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर हे शनिवार दिनांक ५ जुलै रोजी जालना शहरात येत असून ते पक्ष बांधणी व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंर्भात जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत.

जालना शहरातील अंबड चौफुलीवरील शासकीय विश्रामगृहात दुपारी १ वाजता आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय सचिव संजीव बोधनकर, महाराष्ट्राचे नेते डॉ. सुनील सूर्यवंशी, प्राचार्य सुनील वाकेकर आदींची उपस्थिती राहणार आहे. या बैठकीत जालना जिल्ह्यातील अनुदान घोटाळा, खत टंचाई आदी बाबत पक्षीय भूमिका निश्चित केली जाणार आहे.



या बैठकीस रिपब्लिकन सेनेच्या जिल्ह्यातील पदाधिकारी, युवक व महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन सेनेचे जालना जिल्हाध्यक्ष ( पश्चिम) लिंबांजी वाहुळकर, पूर्वचे जिल्हाध्यक्ष दिनेश आदमाने,जालना तालुकाध्यक्ष भीमराज खरात आदींनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.